# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक १८/९/२००७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.०९) इतिवृत्त**

मंगळवार दिनांक **१८ सप्टेंबर २००७** रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री. त्र्यंबक गणपतराव तुपे** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **दुपारी ०३.४० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त, नगर सचिव व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

1. श्री. मधुकर दामोधर सावंत
2. श्री. संजय पांडूरंग शिरसाट
3. श्री. मोहन मेघावाले
4. श्री. हिंमतराव साळूबा दाभाडे
5. श्री. मो. जावेद मो. इसाक
6. श्री. अ. रशीद खान (मामु)
7. श्री. वसंत पांडूरंग नरवडे
8. श्री. पुनमचंद सोनाजी बमणे
9. श्री. संजय रामदास जोशी
10. डॉ. आशा बिनवडे
11. श्री. अ. साजेद अ. सत्तार
12. श्री. हाजी शेरखान अ. रहेमान

**<u>संवाद :</u>**

श्री. संजय शिरसाट : मा. आयुक्त हे नांदेड येथे निवडणुकीच्या कामासाठी निरीक्षक म्हणून जाणार आहेत. त्याची तयारी झाली असून काही अधिकारी त्यांना रेल्वेस्थानकावर सोडवायला गेलेले आहे अशी माझी माहिती आहे. काहींना मी फोन करून सांगितले. त्यांना वाटते मा.आयुक्त हे सर्वासाठी आहेत. जे अधिकारी आजच्या सभेला उपस्थित नाहीत अशा अधिकार-यांना त्वरीत नोटीसेस देवून पूढील बैठकीत वेळेवर उपस्थित राहण्या संदर्भात बंधनकारक करावे. जेणे करून वेळेचे महत्व कळेल.

श्री.वसंत नरवडे : अशी कार्यवाही होणे गरजेचे आहे त्या शिवाय कामे होणार नाही. तसेच जे विषय विषयपत्रिकेवर असतात त्या सर्वाची माहिती देण्यासाठी ते ते अधिकारी सभागृहात उपस्थित असणे आवशक आहे तशी ताकीद देण्यात यावी. सभापती म्हणून थोडीशी कठोर भुमिका घेणे सयुक्तीक ठरेल.

मा. सभापती : दोन ते चार अधिकारी विचारून गेलेले आहे उर्वरीत अधिकारी का आलेले नाही जे आले ते उशीरा काआले याचाही खुलासा करावा.

श्री.मधुकर सावंत : या सभागृहाचा मान राखणे हे अधिका-यांचे कर्तव्य आहे. अधिका-यांनी सभागृहात वेळेवर न येणे ही बाब चांगली नाही. अशा अधिक-यावंर कार्यवाही केली पाहिजे.

मा.सभापती :संबधीत अधिकारी यांनी या संबधी खुलासा करावा.

उप आयुक्त(प्र.) : माझ्या अधिपत्त्याखालील डॉ. रझवी हे उपसंचालक यांचेकडे पशु गणनेची बैठक असल्यामूळे त्या बैठकीला जाणार होते परंतू मा.सभापती यांनी परवानगी दिल्यासच जावे असे मी सुचविलेले होते. तसेच विधी सल्लागार हे माझी विचारणा करून न्यायालयीन कामासाठी गेलेले आहे.

श्री.संजय शिरसाट : विधी सल्लागार यांना न्यायालयात कोणते काम होते कोणत्या प्रकरणाचे होते कोणत्या कोर्टात होते प्रकरणाचा नंबर सागांवा मा. सभापतीनी सभेला उपस्थित राहण्याचे निर्देश देवूनही गैरहजर राहणे योग्य नाही. विधी सहाय्यक श्री.सिरसाट यांना न्यायालयीन कामासाठी पाठविता आले असते. बोर्डावर ते प्रकरण होते का?

उप आयुक्त (प्र.) : मा.न्यायालयात कोणत्या प्रकरणा संबधी गेलेले होते याचा लेखी खुलासा घेण्यात येईल.

श्री.संजय जोशी :ज्या बैठकीला आयुक्त नसतात त्या बैठकीला अधिका-यांनी उपस्थित न राहण्याचे अघोषित केल्याचे दिसून येते.मा. सभापती यांचे परवानगी शिवाय कोणकोणते अधिकारी गैरहजर आहे त्यांची नोंद घ्यावी.

मा. सभापती :श्री. डी. पी. कुलकर्णी यांनी माझी परवानगी घेवून गेलेले आहेत. विधी सल्लागार या मा.न्यायालयात कोणत्या कामासाठी गेलेल्या आहेत खुलासा करावा.

विधी सहाय्यक :विधी सल्लागार यांनी म्हटले की आज श्री. अग्रवाल यांचे कोर्टात मॅटर आहे

श्री.संजय शिरसाट : कोण अग्रवाल आहे आता दु. ३.०० वा. बोर्डावर प्रकरण होते का याचा खुलासा करावा.

विधी सहाय्यक :बोर्डावर प्रकरण होते त्याचे सुनावणीसाठी त्यांना जायचे होते म्हणून गेलेले आहेत.

श्री.संजय शिरसाट :कोणतेही प्रकरण बोर्डावर नव्हते. कोण अग्रवाल आहे माहित नाही. ती एवढी महत्वाची होती का? स्थायी समितीमध्ये गुणवानीचे प्रकरण चालू असतांना त्या प्रकरणाचा अहवाल आज सभागृहात येत असतांना, विधी सल्लागार या ठिकाणी उपस्थित नसणे हे बरोबर नाही. त्यांना सभागृहात बोलावण्यात यावे. महत्वाच्या विषयावर चर्चा करणे आहे.

मा.सभापती : सुनावणी चालू आहे की संपलेली आहे यांची विधी सहाय्यक यांनी माहिती घ्यावी. हेअरींग झाली असेल तर विधी सल्लागार यांना त्वरीत बोलविण्यात यावे. कोणते अग्रवाल आहे याची त्वरीत माहिती घ्यावी.

श्री.संजय शिरसाट : जकात संदर्भात अग्रवालचे प्रकरण चालू आहे महापालिकेचा काहीही संबध नाही.

श्री.वसंत नरवडे : जे गैरहजर आहेत त्यांचे बाबतीत निणर्य घेण्यात यावा.

मा. सभापती : जे अधिकारी विना परवानगी गैरहजर आहे त्यांना कारणे दाखवा नोटीस देवून नियमानुसार कार्यवाही करावी व पूढील बैठकीत सर्व अधिका-यांनी वेळेच्या आत (सभेपुर्वी अर्धा तास अगोदर) उपस्थित रहावे अशी सुचना देण्यात येत आहे.

श्री.हिम्मतराव दाभाडे : दोन वर्षापासून मुथीयान कॉर्नर येथील श्री. घोरपडे यांनी केलेल्या अतिक्रमणाचा मुद्दा मी मांडतो आहे. सदर संचिकेमध्ये मी कोणताही जागेचा मोबदला घेतलेला नाही मला पर्यायी जागा देण्यात यावी म्हणून अर्ज दिलेला आहे.परंतू सदर व्यक्तीने जागेचा मोबदला घेतलेला असून धनादेश त्यांना दिलेला आहे. प्रकरणाची दखल घेतली जात नाही. सदर व्यक्तीला त्या जागेवर बांधकाम परवानगी दिली असून प्रशासनाच्या चूकीमूळे सदर व्यक्ती न्यायालयात दाद मागण्यासाठी गेले असता त्या प्रकरणात मा. न्यायालयाने महापालिकेच्या विरोधात निकाल दिलेला आहे.आतापर्यत महानगरपालिकेनेकिती प्रकरणात केसेस जिंकलेल्या आहे.नगरपालिकेचा वकील आहे असे दाखवून भुखंड हडप करीत आहेत अशा अधिका-यांना त्वरीत या पदावरून काढण्यात यावे अशी माझी मागणी आहे.

मा. सभापती : विधी सल्लागार यांनी खुलासा करावा.

विधी सहाय्यक : विधी सल्लागार हजर राहणार नाही त्यांचा दुरध्वनी लागलेला नाही. श्री.माधव घोरपडे यांनी सिटीएस नं.१६९११/१/अे/१ क्षेत्रफळ ३९२.७५ उस्मानपूरा जुना सर्वे नं.६ शीट न.१५२, १६९ मध्ये जे बांधकाम केले ते पाडून टाकण्यास व हस्तक्षेप करण्यास प्रतिबंध करणे संबधी दावा केला आहे. त्यात स.स.श्री. दाभाडे तसेच महानगरपालिकेला पार्टी केलेले आहे. सदर प्रकरणामध्ये मनाई हुकूमाच्या अर्जावर सुनावणी होवून मा. न्यायालयाने संबधीतांचा तुर्त मनाई हुकूमाचा जो अर्ज होता तो अर्ज मान्य केलेला आहे.अजुनही या प्रकरणात अंतिम निणर्य झालेला नाही त्या मनाई हुकूमाच्या अर्जाच्या सुनावणीवर कोर्टाने आदेश केलेले आहे दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून न्यायालयाने असे आदेशीत केले की वादीने बांधकाम करतांना बांधकाम परवान्याचे अटी शर्तीचे उल्लघन केल्यास संबधीत कायदयाच्या तरतुदीनूसार प्रतिवादी महानगरपालिका योग्य ती कार्यवाही करणेस मोकळे राहिल.असे आदेश मा. न्यायालयाने दिलेले आहे.

श्री.हिम्मतराव दाभाडे : अधिकारी यांनी गोलमोल उत्तर दिलेले आहे या प्रकरणात महापालिकेच्या विरोधात निकाल गेलेला आहे की नाही एवढाच खुलासा करावा.

विधी सहाय्यक : श्री. घोरपडे यांचा जो अर्ज आहे तो मंजूर केलेला आहे परंतू महापालिकेला बांधकाम परवान्याच्या अटी शर्तीनूसार बांधकाम केलेले नसेल तर कार्यवाही करण्याची मुभा दिलेली आहे.

श्री.हिम्मतराव दाभाडे : जागेचा मोबदला घेतलेला ही चौकशी केली असती तर बांध्काम परवानगी दिली जात नव्हती असे असतांना परवानगी कोणत्या नियमानूसार दिलेली आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : जागेचामोबदला दिल्यानंतर परवानगी कोणत्या नियमानूसार दिलेली आहे. संबधीत मालकांचा मालकी हक्क संपुष्टात आलेला होता. आतापर्यत परवानगी रद्द का केलेली नाही. मोबदला देवून महापालिका त्या व्यक्तीच्या मागे फिरते आहे. उलट महापालिकेला पार्टी करून कोर्टात प्रकरण दाखल केले आहे.

श्री.संजय शिरसाट : या प्रकरणात कुणाच्या बाजूने निकाल लागलेला आहे एवढाच खुलासा करावा.

श्री.अ.साजेदअ.सत्तार : परवानगी लिगली दिली की इल्लीगल, या संदर्भात विधी विभाग तसेच नगररचना विभागाने खुलासा करावा. परवानगी दिली नसती तर हा वाद उद्‌भवला नसता आतापर्यत मोबदला दिलाच नाही असेच उत्तर येत होते.

विधी सहाय्यक : न्यायालयीन प्रकरणाचा जो अर्ज आहे त्यावर अंतिम निणर्य झालेला नाही. मनाई हुकूमाचा जो अर्ज होता त्यावर मा. न्यायालयाने आदेश दिलेले आहे की सदरील अर्ज मान्य करण्यात येतो महापालिका ही सार्वजनिक हित जपणारी संस्था आहे बाधकांम परवानगीचे उल्लंघन होत असेल तर कार्यवाही करण्याचे निर्देश दिलेले आहे.

श्री अ.रशिद खॉन :परवानगी अधिकृत दिलेली आहे का? जागेचा मोबदला दिला असतांना परवानगी कशी दिली मोबदला दिल्याचे रेकॉर्ड आहे का ?विधी विभगाने नगररचना विभगास परवानगी कशाच्या अधारे दिली अशी विचारणा केलेली आहे का याचाही खुलासा करावा

विधी सहाय्यक :जी बाधकाम परवानगी दिलेली आहे नगररचना विभगाकडून माहिती आलेली आहे अतिक्रमण नाही परवानगी दिलेली आहे अशी माहिती नगररचना विभगाकडून आलेलीच मा. न्यायालयात दिलेली आहे.

श्री.अ.रशिद खान : सबधीत व्यक्तीने जागेचा मोबदला घेतलेला आहे व बोगस पध्दतीने कागदपत्र देवून परवानगी मिळवली हे मा.न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिलेले आहे का?

श्री.अ.साजेद अ.सत्तार : खुल्या जागेवरही नगररचना विभाग परवानगी देईल ते ही बरोबर आहे असे विधी विभाग म्हणू शकेल का? जी परवानगी दिली ती लिगल आहे का एवढाच खुलासा करावा.

डॉ.आशा बिनवडे : मागिल बैठकीत मा.आयुक्त यांनी या संदर्भात एक कॉमन बैठक घेवून योग्य तो निर्णय घेतला जाईल असे म्हटले होते आताच विधी सहाय्यक हे सांगतात की नगररचना विभगाकडून जी माहिती आली ती मा.न्यायालयात सादर केली. आलेली माहिती जशीच्या तशीच सादर करण्यासाठी त्या पॅनल वरील वकीलाना मुळीच नेमलेले नाही. जेंव्हा महापालिकेच्या हिताची केसेस लढविता ते महापालिकेचे वकील असतात सर्व माहिती घेवून मा.न्यायालयात माहिती मांडावयास पाहिजे जर परवानगी बरोबर होती तर प्रशासकीय विभागाने त्यास प्रतिबंध का केलेला होता.अशा प्रकारची उत्तरे देणे योग्य नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : जी परवानगी दिलेली लिगल की इल्लिगल आहे. स.सदस्य तसेच संबधीत व्यक्ती यांची हेअरींग घेणार होते, का घेतलेली नाही.

श्री.संजय जोशी : नगररचना विभागाचे आजच्या बैठकीला विषय आहे अधिकारी यांना सर्व संचिका हाताळण्यास कार्यालयात वेळ असतो परंतू संबधीत अधिकारी यांना बैठकीला येण्यास वेळ नसतो हे योग्य नाही.या सर्वाच्या मागे मा.आयुक्ताचीच इच्छा असावी की सभागृहाला माहिती मिळवू नये. कारण मागिल बैठकीत आदेश दिल्यानंतर सदर सचिंका मागविली गेली अर्धा तास मा.आयुक्तानी त्या संचिकेवर अभ्यास केला त्यानंतर तीन बैठका झालेल्या आहे.तरी सुध्दा प्रशासन उत्तर देवू शकत नाही याचा अर्थ मा.आयुक्त सुट्टीवर जातात त्या दिवशी ते सर्व बांधून सोबत नेतात का? मा.आयुक्त नसल्याने कूणीच उत्तर देवू शकत नाही. उपअभियंता यांना विचारले तर दिलेली परवानगी लिगलच असते. इलीगल कशी देणार असे उत्तर येईल.मा. आयुक्त मा. सभापती तसेच स. सदस्य यांनी एकत्रित बसून निर्णय घ्यावा असे ठरले होते. वारंवार त्या विषयावर चर्चा होवून सभागृहाचा वेळ वाया जाणार नाही. याबाबत निणर्य घेण्याचे आदेशीत करावे. प्रशासनाने निर्णय घेतला नाही तर ज्या अधिका-यांनी परवानगी दिली त्या अधिका-यांवर पूढील बैठकीत कार्यवाही करण्याचे निर्देश द्यावे. उत्तर बरोबर दिले नाही उशीर झाला तर अधिकारी चूकीचे काम करतात की काय अशी शंका येते. तीन दिवसात कार्यवाही करण्याचे आदेशीत करावे.

शहर अभियंता : श्री. घोरपडे यांचे प्रकरणाची चौकशीचे आदेश माझ्याकडे दिलेले आहे. आणखी १५ दिवस कार्यवाहीसाठी लागतील.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :या संदर्भात सर्वसाधारण सभेत चर्चा झालेली होती चौकशी समिती नियुक्त केली त्यात मी पण होतो उपआयुक्त श्री. आनंदकर याचा समावेश होता. त्या चौकशी अहवालाचे काय झाले याचा खुलासा करावा.

मा. सभापती : या प्रकरणात ८ दिवसाच्या आत कार्यवाही करून अहवाल सादर करावा.

श्री.मधुकर सावंत :आताच खुलासा केला की नगररचना विभागाच्या बाधकाम परवानगीचे अटी शर्तीचे उल्लघन झाले असेल तर ते तोडायला पाहिजे.ज्या व्यक्तीची जागा डीपी प्लॅनमध्ये जाते रस्ता होतो त्या जागेचा मोबदला घेतो पून्हा जागेच्या बदल्यात जागा मागतो जागा दिली जाते बाधंकाम परवानगीची मागणी केल्यानंतर तीही दिली जाते. अटी शर्तीचे उल्लंघन झालेले आहे, का कार्यवाही होत नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : मोबदला दिला का तो दिल्यानंतर बांधकाम परवानगी दिली का?

शहर अभियंता : जेंव्हा लेआउट झालेला होता त्याची तपासणी करावी लागणार आहे किमान १५ दिवस माहिती घेण्यास लागतील.

श्री.मधुकर सावंत :लेआउट मधील जागा दिलेली नाही ओपनस्पेस मधील जागा आहे.स.सदस्य प्रत्येक बैठकीत हा विषय पोटतिडकीने मांडतात कार्यवाही केली जात नाही. १५ दिवसात हा विषय मार्गी लावण्यात यावा.

श्री.हिम्मतराव दाभाडे : चौकशी होईपर्यत चालू असलेल्या कामास स्थगिती आणावी.

शहर अभियंता : कोर्टाचे आदेशानूसार काम थांबविता येणार नाही असे माझे वैयक्तिक मत आहे.

श्री.मधुकर सावंत : सदर व्यक्तीने महानगरपालिकेच्या बांधकाम परवानगीचे उलंघन केलेले आहे हे उघड होते. मा.न्यायालयाचे तेच निर्देश आहे.असे असतांना या संदर्भात कार्यवाही का होत नाही चौकशी करावी तो पर्यंत बांधकाम थांबविण्यात यावे.

श्री.मो.जावेद मो.इसाक :या संदर्भात अडीच वर्षापासुन चर्चा होत आहे.१५ ते २० दिवसाचा वेळ दिला जातो त्यानंतर कमेटी केली जाते निणर्य काहीच समोर येत नाही हा सभागृहाचा अवमान आहे. १५ दिवसात निकाली काढले नाही तर संबधीत जे असतील त्यांचेवर कार्यवाही करावी.

श्री.मधुकर सावंत : सदर व्यक्तीला जागेचा मोबदला दिला ही बाब विधि विभागाने मा.न्यायालयाच्या निर्दशनास आणुन दिलेली नाही. पॅनल वरील वकील सुनवणी साठी हजर राहत नाही त्यामुळे महानगरपालिकेच्या विरोधात निकाल जातात. हे महानगरपालिकेच्या हीताचे नाही. याची प्रशासनाने दखल घेतली पाहिजे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : या जागेचा मोबदला दिला हा खुलासाच मा. न्यायालयात महापालिकेने दिलेला दिसून येत नाही.

मा.सभापती :शहर अभियंता यांनी १५ दिवसात संपुर्ण चौकशी करुन अहवाल सादर करावा.

डॉ. आशा बिनवडे :माझ्या वार्डातील आरक्षण २२७, २२८ संदर्भात मागिल बैठकीत माहिती विचारलेली होती सर्च रिपोर्ट पूढील बैठकीत दिला जाईल असे मा. आयुक्तांनी म्हटले होते तो रिपोर्ट आलेला आहे का त्या जागेची खरेदी विक्री झाली तरी सूध्दा सर्च करणेच चालू आहे हे योग्य नाही. खुलासा घेण्यात यावा. तसेच कचरा उचलण्यासाठी घंटा गाडी द्यावी म्हणून म्हटले होते दिली नाही.

मा.सभापती :माहिती घेणे चालू आहे १५ दिवसाचा वेळ दिलेला होता.

श्री.अ.रशिद खान :या शहरात कुत्र्यांची संख्या वाढलेली आहे. काल १५ ते २० लोकांना बस स्टॅण्डवर चावा घेतला. पकडल्यानंतर फॅमीली प्लॅनींग करून सोडून दिले जाते जर पुन्हा चावले तर काय कार्यवाही करणार आहे खुलासा करावा. या प्रकरणी किमान न्यायालयात तरी प्रकरण दाखल करुन जो कायदा काढलेला आहे तो चुकीचा आहे ते निर्दशनास आणुन द्यावे. यावर तात्काळ उपाय योजना करावी.

श्री.मो.जावेद मो.इसाक : स.सदस्य श्री. हाजी शेरखान यांचे घरावरील टेरेसवर ३० कुत्रे एकदम आले होते.

श्री.नरवडे पाटील : एका लहान मुलास एकाच कुत्र्याने तीन वेळेस चावा घेतला त्यासाठी औषध का दिले नाही. ही जबाबदारी कुणाची असते. आज मेडीकलने रिपोर्ट दिला की महापालिकेने औषधी पाठविली नाही. काल घाटीत कुत्र्याने चावा घेतल्याचे तीन रूग्ण आढळले त्यांना औषधी दिली नाही १०००/- रू. ला एक लस येते मी व स.सदस्य श्री. साजेद यांनी औषधोपचारासाठी स्वत: पैसे दिले गरीब लोक एवढा मोठा खर्च करू शकत नाही.

डॉ.आशा बिनवडे :रस्त्यावरील कुत्र्यांची संख्या वाढलेली आहे त्यामूळे अनेक चावा घेतल्याच्या केसेस वाढलेल्या आहे. रस्त्यावरील कुत्र्याचा तसेच पिसाळलेल्या कुत्र्यांचा बदोबस्त करणे हया दोन जबाबदा-या महापालिकेच्या आहेत ज्या रूग्णाला चावा घेतलेला आहे त्यास

लस पुरविणे ही जबाबदारी महापालिकेची असतांना दोन्ही जबाबदारी टाळण्यात येत आहे. यास कोण जबाबदार आहे कूणावर जबाबदारी फिक्स करणार आहे.

श्री.वसंत नरवडे : चूक करणा-या अधिका-यांना साधी नोटीस देण्याची जबाबदारी मा.आयुक्त घेत नाही ती जबाबदारी या सभागृहाने घ्यावी.

डॉ.आशा बिनवडे : हे अत्यावशक सेवेत मोडते ते करणे आवश्यक आहे. महापालिका या विषयी काय करणार आहे याचे उत्तर घ्यावे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : कालच्या मुलाचे हाल बेकार होते. आम्ही प्रत्यक्ष बघीतले. महानगरपालिकेच्या दवाखान्यात याची लस उपलब्ध नाही, ही सुविधा देणे ही महानगरपालिकेची जबाबदारी आहे.

श्री.संजय जोशी : कुत्रा चावल्यानंतर औषधी देता येईल परंतू न चावण्यासाठी काय उपाय करू शकतो.

आरोग्य वैद्य.अधिकारी : या वर्षी एकूण ७.५ लक्षचे २२०० लस विकत घेतलेली होती. त्यापैकी १७५० शिल्लक आहेत. याचा कुठेही तुटवडा नाही मेडीकल कॉलेजकडून फिस मिळत नाही म्हणून देत नाही इतर महापालिकेचे २४ तास चालू असणारे पाच दवाखान्यात ही लस आहे.

डॉ.आशा बिनवडे : फिस मिळत नाही म्हणून न देणे योग्य नाही महापालिका ही स्थनिक स्वराज्य संस्था असल्याने या शहरातील नागरीकासाठी पुरवठा करण्याची जबाबदारी महापालिकेची असल्यानेच शासनाकडून घाटीसाठी लस दिले जात नाही.वारवांर तसे मेडीकल कॉलेजने महापालिकेला कळविले. २४ तास महापालिकेचा दवाखना चालू नसतो म्हणून प्रत्येक रूग्ण महापालिकेच्याच दवाखन्यात येईल असे होवू शकणार नाही.

श्री.संजय जोशी : या तांत्रिक बाबीमूळे सामान्य लोकांनी कुचंबना होते यापूढे जे ही लस खरेदी करू त्यातील ५० टक्के घाटी दवाखान्यासाठी देण्याची कार्यवाही करावी आताच तसा निर्णय घ्यावा व ती लस कोणत्या रूग्णासाठी वापरली त्यांचे नावासहीत सर्व रिपोर्ट शेवटी महापालिकेने मागवून घ्यावा. अशी परीस्थिती निर्माण होणार नाही.

डॉ. आशा बिनवडे : जेथे रूग्ण येत असतील त्या दवाखान्यात उपलब्ध करून द्यावे.

श्री.अ.रशिद खॉन :शहरातील नागरीकांचे महापालिका हित जोपासू शकत नाही त्याचा निषेध म्हणून आम्ही सभागृहा बाहेर जात आहे.

(याच वेळी स. सदस्य श्री अ. रशिदखान तसेच इतर तीन सदस्य सभागृहा बाहेर निघून जातात.)

श्री.संजय जोशी : याबाबतीत सर्वस्वी निणर्य घेण्याचे अधिकार स्थायी समितीला आहे.२५ लक्षचे खाट महापालिकेने घाटीस दिले त्यामूळे रूग्णाचा जीव वाचवू श्कणार नाही परंतू या लसीमूळे रूग्णाचा जीव वाचेल.

श्री.संजय शिरसाट :२२०० लस खरेदी केले १७५० शिल्लक आहे ज्या लस दिल्या कोणत्या दवाखान्यात किती दिवसात वापरात आणले केंव्हा खरेदी केलेली होती याची माहिती द्यावी.

डॉ.आशा बिनवडे : ब-याच वेळा या विषयावर चर्चा झालेली होती सात लक्षची तरतूद केली असतांना आरसीवर उपलब्ध होत नाही किंवा मिळत नाही म्हणून खरेदी करणे सुध्दा टाळले होते.ही लस अत्यावश्यक औषधामध्ये येते तातडीची लागणारी औषधी ही आरसीवरच खरेदी करावी असे बंधन नाही.

आरोग्य वैद्य. अधि. :लस केंव्हा घेतली व कोणत्या केंद्रात दिली व कोणकोणत्या भागातील लोकांना दिली याची माहिती घेण्यात वेळ लागेल.

श्री.संजय शिरसाट :केंव्हा खरेदी केली अधिका-यांना माहिती नाही. मागिल अर्थसंकल्पात कि चालू अर्थसंकल्पात घेतली.

आरोग्य वैद्य. अधि. : एक वर्ष खरेदी करून झालेले आहे.

श्री.संजय जोशी : एक वर्ष खरेदी करून झाले या कालावधीत २००० लस देण्यात आल्या याचा अर्थ एका दिवसाला किती लोकांना कुत्र्याने चावा घेतला याचा विचार करीत नाही का?

श्री.संजय शिरसाट :वर्षभरात २००० लस लागल्या असतील तर गंभीर बाब आहे याचा सवीस्तर अहवाल मा.सभापती मा.महापौर तसेच मा.आयुक्त यांना देणे आवश्यक होते. कोणत्या दवाखान्यात किती व कुणास लस दिल्या नोंद वही असेल, पुढील बैठकीत अहवाल मागवावा.

(याच वेळी सभागृहा बाहेर निषेध करून गेलेले स. सदस्य पून्हा सभागृहात येवून बसतात.)

श्री.संजय जोशी : वर्षभरात जर कुत्रा चावतो म्हणून २००० लस द्याव्या लागत असतील तर हा संपूर्ण अहवाल मा. न्यायालयाच्या निदर्शनास आणून द्यावा. जेणे करून कुत्र्याचा बदोबस्त करण्यास परवानगी मिळेल. संख्या खूप वाढलेली आहे.

उपआयुक्त(प्रशासन) : रस्त्यावर फिरणारे कुत्रे यांना पकडावे मारू नये असे मा.न्यायालयाचे आदेश आहे त्यानूसार संपूर्ण देशात अशा पध्दतीने कार्यवाही होत आहे. सेन्ट्रल गव्हरमेंन्टने ॲनीमल डॉग कन्ट्रोल कमेटी स्थापन केलेली असून त्या मार्फत यामध्ये काययोजना करता येईल हाच विचार चालू आहे. आजच्या स्थितीत कुत्रे पकडल्यानंतर स्टरलाईज करून पून्हा सोडून द्यावे लागते.

डॉ.आशा बिनवडे : संख्या मोठया प्रमाणात वाढलेली आहे. या बाबतीत काहीही नियोजन नाही.उत्पत्ती जास्त होणार नाही याची दक्षता घेत आहोत.

उपआयुक्त (प्रशासन) : पकडून एका खोलीमध्ये ठेवण्याचा प्रोजेक्ट केलेला आहे त्यामूळे उत्पत्ती जास्त होणार नाही.याची दक्षता घेत आहोत. हाच प्रश्न मुंबई महापालिकेसमोर सुध्दा आहे केंद्र शासनाने या संदर्भात कमेटी स्थापन केलेली आहे यावर उपाययोजना करण्या संबधी सुचना करतील त्यानूसार कार्यवाही होईल. या सभागृहाच्या ज्या ही सूचना असतील त्या शासन स्तरावर पाठविण्यात येतील.

श्री.संजय जोशी : हे मा.सर्वोच्च न्यायालयाचाच आदेश आहे मुंबई महापालिकेचे आयुक्त यांनी देवनारला जो कुत्र्याचा त्रास आहे त्या संबधी अहवाल मा. न्यायालयात सादर केलेला आहे आपल्या प्रशासनाने अदयाप काहीच केले नाही. उदा. इको झोन होणार म्हणून या जिल्हयातील तळागाळातील लोक शासन दरबारी जावून आले.वर्षभरात इतके कुत्रे चावतात व इतक्या लसेस दयाव्या लागतात त्या रूग्णाच्या नावासह अहवाल मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल करावा. नागरीकांना त्रास होत आहे शहरात प्रत्येक गल्लीत मोकाट कुत्रे दिसून येतील.

श्री.अ.रशिद खान : घाटी दवाखान्यात दररोज असे किती रूग्ण येतात माहिती मागवावी तेथे गरीब लोक असतात ते एवढा मोठा खर्च देवू शकत नाही.

मा.सभापती : घाटी दवाखान्यात महापालिकेला लसेस देता येईल का याचा खूलासा करावा.

आरौग्य वैद्य.अधि. :या बाबत धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल जसे आदेशीत केले त्याप्रमाणे वाटप करण्यात येईल.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : घाटी दवाखान्यात लसेस दिल्या तरी गरीब लोकांना त्यांचा लाभ होईल असे वाटत नाही बाहेरून औषधी मागवतो म्हणून ब्लॅकमेल करणार त्यासाठी महापालिकेच्या दवाखान्यात ही लस उपलब्ध आहे असे वृत्तपत्रात जाहीर करावे.जनतेला त्यांचा फायदा घेता येईल.

डॉ. आशा बिनवडे : वर्षातून किती रूग्ण घाटी मध्ये येतात त्याचा अहवाल घ्यावा. तेवढया लसेस उपलब्ध करून द्याव्यात.

श्री.वसंत नरवडे : सिडको साठी एक तसेच जुन्या शहरासाठी एका दवाखान्यात हया लसेस उपलब्ध करून देण्यात यावे.

मा.सभापती :महापालिकेचा एन-८ येथील दवाखाना २४ तास चालू असतो तेथे तसेच जुन्या शहरासाठी एका दवाखान्यात उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करावी.

श्री.संजय सिरसाट :ज्या काही लसेस वर्षभरासाठी लागणार आहे त्या डायरेक्ट मा. आयुक्तांच्या अधिकारात खरेदी करण्याचे आदेशीत करावे तेथे महापालिकेचे एक कर्मचारी तसेच घाटी दवाखान्याचे एक कर्मचारी ठेवून वेळोवेळी अहवाल मागवावा. जेथे जशा लसेस लागतील तेथे उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करावी.

डॉ.आशा बिनवडे : बाहेरील कोणताही रूग्ण पहिल्यांदा घाटीत जाणार आहे तेथेच ॲडमीट करावे लागणार आहे कारण ती सुविधा महापालिकेकडे नाहीच परंतू त्यांना औषध उपलब्ध करून देण्याची जबाबदारी महापालिकेचीच आहे.

श्री.अ.रशिद खान : घाटीतही ॲडमीट केले जात नाही. ती लस नाही म्हणून त्या रूग्णास परत पाठवित होते. त्यानंतर थाबवून ठेवले व आज त्या रूग्णास सुटटी झाली. कुत्र्यांना धरून फॅमीली प्लॅनींग करून सोडून दिले जाते. आपण रेकॉर्ड ठेवले का? जुन, जुलै ची आकडेवारी किती.

मा.सभापती : महापालिकेच्या खर्चाने घाटी दवाखान्यासाठी दोन लक्षचे लसेस खरेदी करण्याची कार्यवाही करावी.

श्री.संजय जोशी : दिनांक २७ सप्टेंबर २००५ रोजीची विषयपत्रिका व त्या सभेचे इतिवृत्त पूढील सभेत आणण्यासाठी आदेशीत करावे.

श्री.वसंत नरवडे : वृत्तपत्रात आले की स्पेक कंपनीचा गाशा गुंडाळणार, स्पेक एजन्सीला मालमत्ता शोधण्याचे काम देण्यात आले. जो करारनामा महापालिकेने केलेला आहे तो किती कालावधी किती कामासाठी व नवीन मालमत्ता किती शोधण्यात आल्या याची तपासणी महापालिकेने करणे गरजेचे आहे. यापासून महापालिकेला किती उत्पन्न झालेले आहे. स्पेकला बील देण्या अगोदर प्रत्येक कागदाची तपासणी होणे आवश्यक होते.जसे आठ दिवसात ऑडीट होते त्याप्रमाणे याची तपासणी झोन वाईज करण्यात यावी. आतापर्यंत किती मालमत्ता आपल्याकडे आलेल्या आहेत. वसूलीचे काम थांबलेले आहे. स्पेकच्या नोटीसेसवर लोकांचे अनेक तक्रारी प्राप्त झलेल्या आहेत त्यावर कुठलाही निणर्य घेतलेला नाही.शहराचा विकास हा मालमत्ता कर तसेच पाणीपटटीच्या वसूलीच्या माध्यमातून केले जाते.लाखो रू. चे ठराव मंजूर होतात त्यासाठी निधी उपलब्ध नाही, दोन तीन महिने ठेकेदाराची बिले मिळत नाही. या स्पेक मूळे किती फायदा झला किती मालमत्ता नवीन आलेल्या आहे, किती मालमत्ता मान्य करून महापालिकेकडे भरणा केल्या मालमत्तेच्या क्षेत्रामध्ये कुठलाही बदल झालेला नसतांना अशा लोकांना स्पेकने नोटीसेस दिलेल्या आहे.महापालिकेच्या पहिल्या नंबरवर दुसरा नंबर टाकण्यात आलेला आहे असे काही प्रकरणे आहेत.स्पेक कडे पात्रता नसलेल्या लोकांनी सर्वे केला त्यानूसार नागरीकांना चूकीच्या नोटीसेस देवून त्यानूसार कराची मागणी आपण करीत आहोत हे चूकीचे आहे.ज्यांच्या तक्रारी आलेल्या आहे त्या तपासल्या गेल्या पाहिजे माझ्या माहिती प्रमाणे एक कोटी रूपये दिलेले आहे व अंतिम बिल देणार असेल व तसे आदेश देणार असेल तर त्यांना अगोदर बंधनकारक करावे ज्या लोकांच्या तक्रारी आलेल्या आहेत त्याचा विचार करून या विषयी योग्य ती कार्यवाही करावी नसता जे जे अधिकारी यात असतील त्यांना जबाबदार धरावे.स्पेकने दिलेल्या नोटीसेस नूसार एकही शहरातील नागरीक समाधानकारक नाही.सर्व काम अर्धवट ठेवून जर ही कंपनी तीचा फायदा करून निघून जात असेल तर योग्य नाही.

कर निर्धारक व संकलक : सन २००४ साली स्पेक या एजन्सीला मालमत्ता सर्वेचे काम सहा महिण्याची मुदत निश्चित करून दिलेले होते. परंतू अद्याप काम पूर्ण झालेले नाही. सिडको

भागातील २९ हजार मालमत्तेचा सर्वेचे काम या एजन्सीने पूर्ण करून दिलेले आहे डिमांड नोटीस व बिले देण्याचे काम सध्या सुरू आहे. नागरीकांच्या तक्रारी आल्यानंतर वार्ड अभियंता यांचे मार्फत तपासणी करून जर चुकीचे असेल तर तात्काळ फेर तपासणी करून याची बिले देण्यात येत आहे. जुन्या शहरातील सर्वेचे काम पूर्ण झालेले नाही जी कामे पूर्ण् करून दिली नाही त्या संदर्भात गेल्या १४ तारखेला हैद्राबाद येथे त्यांच्या कार्यालयास फॅक्स करून सदर अर्धवट राहिलेली कामे एक महिण्याच्या आत पूर्ण करून द्यावी असे कळविलेले आहे. आतापर्यत ८० लक्षचे यापोटी बिल दिलेले असून उर्वरीत काम पूर्ण झाल्यानंतर देण्यात येईल.

श्री.संजय जोशी :सन २००४ पासून सहा महिण्यासाठी सर्वे करण्याचा ठेका दिलेला होता जी मुदतवाढ दिली ती नियमानूसार दिलेली आहे का?

कर निर्धारक व संकलक :जुन २००७ पर्यत मुदतवाढ दिलेली होती.

श्री.संजय जोशी : कोणत्या नियमानूसार व कोणत्या ठरावानूसार मुदतवाढ दिलेली आहे. माझ्या वार्डात खिंवसरा पार्क नावाचा भाग येतो तिस-या मजल्यावर तीन खोल्या नवीन बाधंकाम केले म्हणून नोटीसेस दिल्या पूर्वी परवानगी घेतलेलीच असेल त्यावर आणखी इमारतीवर बांधकाम आहे. जनरली असे झाले की स्पेककडून टॅक्स बरोबर असो की चूकीचा लागलेला असो नोटीस दिली की १३५ रू. स्पेकला मिळतात. ज्याचे स्पेककडून टॅक्स कमी करावे लागले त्यां सर्व प्रकरणात स्पेककडून दुप्पट दंड म्हणून वसूल करावा कारण नागरीकांची फसवणूक स्पेककडून झालेली आहे. ज्यांना नोटीस जाते ते झोन कार्यालयात येतात विनंती करून सांगतात की माझ्या मालमत्तेची स्थळ पाहणी करावी टॅक्स जास्त लागलेला आहे. झोन मध्ये स्पेकचा कर्मचारी जेंव्हा येतो तेंव्हा तो स्थळ पाहणी करतो, तक्रारदाराचे म्हणणे बरोबर आहे म्हणून पुन्हा लागलेला टॅक्स कमी केला जातो.याचा अर्थ स्पेकला नोटीसचे पैसे मिळाले. नागरीकांचा कशासाठी छळ करीत आहोत. आजपर्यंत स्पेक एजन्सीने कुठल्या झोनला किती नोटीसेस दिल्या व किती टॅक्स बरोबर असतांना जास्तीचे लावून नोटीस देवून पुन्हा कमी करावे लागले अशी प्रकरणाची चौकशी करावी.य्महापालिकेला ५० हजार मिळणार व एजन्सीला ८० लक्ष बिल देणार असे होता कामा नये.बीओटीवर सर्वच कामास सुरूवात केलेली आहे महापालिकेला यात काय फायदा झला अहवाल येवू दयावा जेणे करून स्पेकने नक्की काय काम केले हे समजून येईल.

श्री.वसंत नरवडे :एजन्सीला ८० लक्ष दिले नवीन मालमत्ता शोधल्या पोटी किती जास्तीचे उत्पन्न झालेले आहे. सिडकोचे हस्तारण झाले तेथील मालमत्तेचे सर्व्हे महापालिकेला करता आले असते. तेही एजन्सीला दिले शहरातील अनेक मोठमोठया इमारतीतील काही घरांना टॅक्स आकारणी केली काहीची बाकी ठेवलेली आहे.स्पेक एजन्सीने दिलेल्या नवीन मालमत्ता व जुन्या यात किती तफावत आहे नवीन न शोधता ज्या मालमत्ताची टॅक्स पावती दाखवल्यानंतर मोजणीचा काहीही अधिकार नव्हता.मोजणी केली नंबर बदलाला नोटीसेस दिल्या जास्तीचा टॅक्स होतो म्हणून नागरीकाकडून पैसे सुध्दा वसूल केलेले आहे.दलालवाडी भागात एक खोलीची मोजणी केल्यानंतर त्या मालमत्तेचा कर महापालिकेस १२० रू.येणार परंतु नोटीस देवून १३५ रू.स्पेकला मिळाले मा.आयुक्त यांचे निदर्शनास आणून दिलेले आहे.नवीन मालमत्ता मूळे महापालिकेच्या तिजोरीत १० कोटी वसूली जास्तीची व्हायला पाहिजे होती नवीन मालमत्ता शोधून दिलेल्या नसतील व महापालिकेने त्याचे पैसे दिले असतील तर ते स्पेककडून वसूल करावेत.हैद्राबाद येथील स्पेक एजन्सी ही आहे का याची चौकशी करावी कारण टेक्नीकल लोक सर्वेसाठी न ठेवता या एजन्सीने १० वी १२ वी पास असलेल्या मुलांकडून सर्वेचे

काम करून घेतलेले आहे. आणखी १० हजार नवीन मालमत्ता मिळू शकतील अशी परीस्थिती आहे.बिल अदा करतांना समिती समोर यायला पाहिजे जेणे करून कमेटीला नवीन मालमत्ता किती शोधलेल्या आहेत व इतर माहिती मिळू शकेल नवीन किती मालमत्ता शोधलेल्या आहेत याची यादी सभागृहाला सादर करावी.

श्री.संजय शिरसाट : स्पेक एजन्सीला २.२५ कोटीचे काम दिले होते अस्तित्वात असलेल्या मालमत्तेच्या व्यतिरिक्त नवीन झालेल्या मालमत्ता किती आहे हे शोधण्याचे काम दिले होते.तसेच ज्या मालमत्ता शोधल्या व त्यास जो काही कर आकारणार आहे त्या संदर्भात मालमत्ता अधिकारी तसेच स्पेकचे लोकांनी एकत्रित सर्वे करायचा झालेला सर्वे योग्य की अयोग्य हे महापालिकेचे अधिकारी ठरविणार असून नंतर जे काही प्रपोजल आहे ते अंतिम होणार आहे असे ॲग्रीमेंन्टमध्ये दिलेले आहे.सर्वे करण्याचा कालावधी हा सहा महिण्याचा होता त्यास मुदतवाढ देवून देवून तीन वर्ष दिलेले आहे.सिडको नव्याने हस्तांतरण झाले परंतू त्यापूर्वी स्पेकने किती नवीन मालमत्ता शोधलेल्या आहेत.याचा अहवाल आतापर्यंत दिलेला नाही.सर्वे करण्याची या एजन्सीची पध्दतच वेगळी होती वारवांर या सभागृहात त्या विषयी चर्चा होते वृत्तपत्रात छापून येते यामूळे एक प्रकारे अभय देतो असा अर्थ होतो.१३५रू.दिले जाते ते सुध्दा चुकीचे आहे. पदमपूरा भागात मी पूर्वी निवासी होतो घरासमोर माझे नाव लिहिलेले होते सदर घर हे आरआरसीचे असू शकते. घर हे वडीलांच्या नावाने असतांना माझ्या नावाने पावती देवून टाकली. नोटीस देवून टाकली.७/१२ वर अशी पध्दत आहे की जो कुणी कसत असेल त्यांचे कुळ लागले जाते.हे जुने शहर असल्यामूळे वाड्याचे घरे होती एका वाडयात १०-१० किरायदार होते. स्पेकने घर मालक वेगळे किरायदाराच्या नावाने कराची पावती देवून टाकलेल्या आहे. यामुळे किरायदार मालकाला सांगतात घर खाली करीत नाही महापालिकेची मालकी हक्का बाबतची पावती आहे. अशा प्रकारचे वाद स्पेकने निर्माण केलेले आहे. वेळेच्या आत सर्वेचे काम केले नाही तर दररोजचा दंड हा ५ हजार आकारणार म्हणून करारनाम्यात दिलेले होते. दंड भरणे तर दुरच नवीन मालमत्ता किती शोधल्या याचाही रिपोर्ट नाही त्यास बिल किती व द्यायचे की नाही असा प्रश्न पडलेला आहे. गेल्या तीन वर्षात जे १० वी १२ वी पास नापास मुलांकडून सर्वेचे काम करून घेतले. माझ्या वार्डात वेदांतनगर भगात एकाच इमारतीतील सारख्याच पॅटर्न असलेल्या घरांना कमी जास्त कराची पावती देवून टाकली. या सभागृहाचे असे मत झालेले आहे की या एजन्सीला कोणतेही बील यापूढे देवू नये. ज्या मालमत्ता शोधावयाच्या होत्या त्या शोधलेल्या नाही. लोकांच्या अनेक तक्रारी दाखल झलेल्या आहे एका अर्थाने या एजन्सीने महापालिकेची फसवणूकच केलेली आहे. जेवढी रक्कम मिळेल तेवढी घेवून जाण्याच्या तयारीत ही एजन्सी असून यापूढे बिल देण्याचे थांबवून त्या एजन्सीवरच कार्यवाही करण्याचे आदेशीत करावे.

श्री.संजय जोशी : जी रक्कम एजन्सीला दिली ती कमी दिली काय म्हणून ३० पैसे स्क्वेअर फुट प्रमाणे म्हणजे सर्वात कमी भाडयाने रिकामी जागा स्पेकला दिली त्यात संगणक लाईट व टेलीफोन ई. सुविधाही त्यातच आहे.विस्तारीत क्रमांक दिला त्यावरून ते बाहेरील त्याचे खाजगी कामे करीत असेल.केवळ शहरातील नागरीकांची लुट करण्यासाठी ही एजन्सी प्रशासनाने आणलेली आहे असा माझा आरोप आहे.

श्री.संजय शिरसाट : यापूर्वी एक लक्ष मालमत्ता होत्या नगररचना विभगाने परवानगी दिल्यानूसार १.५० लक्ष मालमत्ता असून शकतात ज्या नवीन शोधायला पाहिजे होत्या त्या शोधलेल्याच नाही.

श्री.वसंत नरवडे : ज्यांनी भोगवटा प्रमाणपत्र घेतलेले असेल त्या लिगल आहे परंतू ज्या अनधिकृत आहे त्या भगात लाईट पाणी रस्त्याच्या सुविधा दिल्या अश मालमत्ता का शोधलेल्या नाहीत.याची तपासणी अधिका-यांनी केलेली नाही वरील पान बघून सही केलेली आहे.जुन्यांना नवीन नोटीसेस दिल्या वादात टाकून दिले. नवीन मालमत्ता शोधल्या असेल तर वसूलीत वाढ का होत नाही.वसुली होत नसेल तर विकास कामे होणार आहे का याचा विचार करावा. वसुलीसाठी दोन उपआयुक्तांना काम विभागून दयावे वसूली झालीच पाहिजे तर कामे होतील.

श्री.संजय शिरसाट : स्पेकच्या सर्वेमूळे किती वसूली झालेली आहे याची जॉईन्टली बैठक आयोजित करून योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :तांत्रिक कर्मचा-यांकडून सर्वेचे काम करून घेतले जाईल असे करारनाम्यात आहे.त्यानूसार केले नाही.

मा.सभापती : स्पेक एजन्सी तसेच टॅक्स वसूली संदर्भात लवकरच बैठक आयोजित करण्यात येईल.त्या बैठकीत स्पेकच्या सर्वेच्या संदर्भात अहवाल सादर करावा त्या बैठकीत निर्णय होईल त्यानंतर बिल अदा करावे तोपर्यत बील देण्यात येवू नये.यापूर्वी एका प्रकरणात चौकशी करण्याचे श्री. पानझडे यांना आदेशीत केले होते त्यांनी अहवाल आणलेला आहे ते सादर करीत आहे.

(याच वेळी कार्य. अभिंयंता श्री पानझडे हे सभागृहात मा. सभापतीकडे अहवाल सादर करतात.)

श्री.अ.साजेद अ.सत्तार : शहरातील काही ऐतिहासिक दरवाजांचे काम करण्यात आले. त्या दरवाजावर पूर्वीची बोर्ड होते ते कूठे आहे. तसेच नवीन बोर्ड का लावलेले नाही.

अति.शहर अभियंता :सन २००५-०६ पासून ऐतिहासिक दरवाजाचे काम सुरू करण्यात आले आहे.चार दवाजाचे कामे पूर्ण होत आलेली आहे.

श्री.संजय शिरसाट :या संदर्भात स्थायी समितीमध्ये आदेशीत केलेले होते मा. सभापती याचे नावाने अहवाल देवून मा.आयुक्तांना याची प्रत मिळणे आवश्यक होते. सभागृहाचे क्रेडीट सभागृहालाच अगोदर मिळाले पाहिजे. प्रत आयुक्तांना देवून दोन क्रमांकावर सर्व सदस्यांना प्रत द्यायला पाहिजे होती.

श्री.अ.रशिद खान : पंधरा दिवसात श्री. पानझडे यांनी अहवाल सादर केल्याबद्दल सभागृहाच्या वतीने त्याचे अभिंनंदन करतो.

श्री.संजय जोशी : यात दुरूस्ती करून सभागृहात प्रत सादर करावी.

मा. सभापती : या अहवालाची प्रत सर्व प्रत्रकारांनाही देण्यात यावी.

श्री.हिम्मतराव दाभाडे :पीरबाजार येथील नागसेन विद्यालय येथे माजी मंत्री श्री.गंगाधर गाडे यांनी शाळेची ड्रेनेज लाईन महानगरपालिकेच्या ड्रेनेज लाईनच्या मेनहोल मध्ये मिळविलेली आहे त्याची परवानगी त्यांनी घेतलेली आहे का?

मा.सभापती : पुढील बैठकीत या संबधी संबधीत अधिकारी यांनी माहिती सादर करावी.

**<u>विषय क्र. 128 :</u>**

दि. **17/7/2007**(का.प.क्र. 5) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**<u>संवाद :</u>**

मा.सभापती : विषय क्र. १२८ ते १३९ मंजूर करण्यात येत असून ऐनवेळचे जे विषय आलेले आहे त्यासही मंजूरी देण्यात येते.

**<u>ठराव :</u>**

दि. **17/7/2007** रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. 129 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.17 मधील विविध गृह निर्माण संस्थांमधील अंतर्गत रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणे या कामाचे म.जि.प्राधिकारण विभागाच्या सन 2006-07 च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.11,30,500/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असुन त्यास मा.आयुक्तांची मान्यता झालेली आहे. कामाचा खर्च हा नवीन खडी रस्ते, नवीन कॉंक्रीट रस्ते या लेखाशिर्षा मधुन करण्यात येणार आहे. करीता कामाचे अंदाजपत्रक रू.11,30,500/- चे विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.17 मधील विविध गृह निर्माण संस्थांमधील अंतर्गत रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.11,30,500/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 130 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, प्रभाग क्र.13, मक्का मस्जीद समोर, एन-12 परिसर व हनुमान मंदिर समोर पेव्हर ब्लॉक बसविणेच्या कामासाठी च्या कामाचे सा.बां.विभाग सन 2006-07 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.12,99,442/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्त यांनी दि.28.8.2007 अन्वये मान्यता दिलेली आहे. सदर कामासाठी अर्थसंकल्प 2007-08 मध्ये नवीन कॉंक्रीट रस्ते या शिर्षकातून पृष्ठ क्र.68, 185, 200, अ.क्र.18, 5 व 4 नुसार रक्कम रू.13.00 लक्ष तरतुद ठेवण्यात आलेली आहे.

करीता सदर कामाचे अंदाजपत्रक र.रू.12,99,442/- मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.13, मक्का मस्जीद समोर, एन-12 परिसर व हनुमान मंदिर समोर पेव्हर ब्लॉक बसविणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.12,99,442/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 131 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, विजयचौक ते कालीका माता मंदीर 50 फुट विकास योजना रस्त्याचे खडीकरण करणे या कामाकरीता सा.बां.खात्याच्या सन 2005-06 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.19,98,800/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2007-08 या आर्थिक वर्षात नवीन खडी रस्ते या लेखाशिर्षाखाली करण्यात आलेला असून कामावरील आर्थिक तरतुद उपलब्ध आहे. सदर कामात 15.00 मी. रूंद विकास योजना रस्त्याचे खडीकरण व बाजूने गटार बांधण्याचा समावेश आहे.

तरी रक्कम रू.19,98,800/-च्या अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विजयचौक ते कालीका माता मंदीर 50 फुट विकास योजना रस्त्याचे खडीकरण करणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.19,98,800/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 132 :**

कार्यकारी अभियंता(ड्रेविइवउ) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.54 मो.संजयनगर स्लम गल्ली क्र.सीसी-9 ते सीसी-16 व मुख्य रस्त्यालगत 300 मी.मी. व्यासाची आणि 250 मी.मी. व्यासाची एसडब्ल्यूजी ड्रेनेज लाईन टाकणे व नवीन मेनहोल चेंबर बांधणे या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां. खात्याच्या सन 2006-07 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून अं.प.रक्कम

रू.15,50,200/- होत आहे. सदरील काम सर्वसाधारण सभा विषय क्र.1011 दिनांक 2.8.2007 अन्वये वळती केलेल्या अर्थसंकल्पातील पान क्र.W-204, अ.क्र.22 वरील रक्कम रू.7.00 लक्ष, W-208 अ.क्र.22 वर 5.00 लक्ष व W-231 वरील अ.क्र.8 वर 4.00 लक्ष अशी एकूण तरतुद 16.00 लक्ष मधून प्रस्तावित आहे व त्यास मा.आयुक्त यांनी दि.29.8.2007 रोजी मान्यता दिलेली आहे.

तरी रक्कम रू.15,50,200/- चे अंदाजपत्रक मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.54 मो.संजयनगर स्लम गल्ली क्र.सीसी-9 ते सीसी-16 व मुख्य रस्त्यालगत 300 मी.मी. व्यासाची आणि 250 मी.मी. व्यासाची एसडब्ल्यूजी ड्रेनेज लाईन टाकणे व नवीन मेनहोल चेंबर बांधणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.15,50,200/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 133 :**

कार्यकारी अभियंता(ड्रेविइवउ) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.28 मो.न्यु एसटी कॉलनी भागात रस्त्यालगत गटार बांधणे व त्यावर आसीसी स्लॅब कव्हर करणे या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां. खात्याच्या सन 2006-07 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रक रक्कम रू.14,73,000/- होत आहे. सदरील काम सन 2007-08 च्या अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष शहरी भागात खुल्या गटारी बांध्णे अंतर्गत पृष्ठ क्र.W-210 वरील अ.क्र.4 प्रमाणे 25.00 लक्ष पैकी सर्वसाधारण सभा विषय क्र.913/10 दि.18.7.2007 अन्वये उपलब्ध 15.00 लक्ष मधून प्रस्तावित आहे. स्थायी समिती समोर प्रस्ताव ठेवणेसाठी मा.आयुक्त यांची दि.29.8.2007 ची मान्यता आहे.

तरी रक्कम रू.14,73,000/- चे अंदाजपत्रक मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.28 मो.न्यु एसटी कॉलनी भागात रस्त्यालगत गटार बांधणे व त्यावर आसीसी स्लॅब कव्हर करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.14,73,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 134 :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.3 यादवनगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाचे रक्कम रू.9,90,200/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरील काम गुत्तेदार मे.ए.एस. कन्स्ट्रक्शन यांच्याकडून 13.33% जास्त दराने काम करून घेण्यात आलेले आहे. परंतु प्रत्यक्ष काम करतांना सदरील भागातील रस्ते ठिकठिकाणी तुटलेले होते व पाणी पुरवठा व ड्रेनेज लाईन टाकल्यामुळे रस्ते बहुतेक ठिकाणी खोदण्यात आलेले होते. तसेच सिडको विभागाने राबविलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेत तोडण्यात आलेल्या घरांची माती, कॉंक्रीट व इतर साहित्य रस्त्यावर पडल्यामुळे रस्ते अतिशय खराब झालेले होते. त्यामुळे सदरील कामात काही बाबीमध्ये वाढ झाल्यामुळे सदरील कामाचे अंदाजपत्रकाच्या रक्कमेत रू.2,39,561/- ची वाढ होत आहे. त्यामुळे सदरील कामाच्या सुधारीत अंदाजपत्रकाची रक्कम रू.12,29,761/- होत आहे.

सदरील कामाच्या रक्कम रू.12,29,761/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर करण्याचे आदेशीत केले आहे.

तरी सदरील कामाचे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.12,29,761/- व हे काम मुळ कंत्राटदाराकडून मान्य दराने करून घेणेचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.3 यादवनगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामात काही बाबीमध्ये वाढ झाल्यामुळे, सदरील कामाचे मुळ अंदाजपत्रकीय रक्कम रू. 9,90,200/- व वाढीव

र. रू.2,39,561/- असे एकूण रक्कम रू.12,29,761/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास तसेच वाढीव काम मुळ कंत्राटदार मे.ए.एस. कन्स्ट्रक्शन यांच्याकडून मान्य दराने म्हणजेच 13.33% जास्त दराने काम करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 135 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, चंपाचौक येथे 12 मी. उंच, सादातनगर येथे 12 मी. उंच व शहागंज येथे 16 मी. उंच असे तीन हायमास्ट उभारण्यासाठी रक्कम रूपये 11,29,514/- रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

रमजानचा पवित्र महिना तसेच गणेश उत्सव हे सणासुदीचे दिवस विचारात घेता सदर काम तात्काळ पूर्ण करावे अशी विनंती मा.विरोधी पक्ष नेता यांनी केली आहे. करीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 5(2)(2) अन्वये उपलब्ध गुत्तेदारामार्फत अंदाजपत्रकीय दराने विना निविदा काम करून घेण्यास व त्यानुसार प्रस्ताव मान्यतेसाठी स्थायी समितीपुढे ठेवण्यास मा.आयुक्त यांनी शिफारस केली आहे.

दिनांक 2.8.2007 रोजी संपन्न झालेली सर्वसाधारण सभा विषय क्र.1048 अन्वये पारीत ठरावानुसार वळती केलेल्या रक्कमेतून (अर्थसंकल्प 2007-08 पृष्ठ क्र.W-228, अ.क्र.32) सदर कामाचा खर्च भागविण्यात येईल.

करीता रक्कम रूपये 11,29,514/- चे अंदाजपत्रकास आणि उपलब्ध गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकीय दराने विना निविदा काम करून घेणेच्या परवानगीसाठी प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.संजय शिरसाट : यासोबतच गजानन महाराज मंदीर चौक, महानुभाव आश्रम(बीड बायपास), पैठण रोड या चौक आणि वॉर्ड क्र.94 राजनगर उद्यानात देखील हायमास्ट बसविण्यास मंजुरी देण्यात यावी.

मा. सभापती : प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. तसेच स.सदस्यांनी सूचना केल्यानुसार गजानन महाराज मंदीर चौक आणि महानुभाव आश्रम(बीड बायपास), पैठण रोड येथील चौक तसेच वॉर्ड क्र.94 मधील राजनगर उद्यानात हायमास्ट उभारण्याचे काम मुं.प्रां. मनपा अधिनियम 1949 चे कलम 5(2)(2) अन्वये करून घेण्यास, त्यासाठी लागणाऱ्या खर्चासह मान्यता देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चंपाचौक येथे 12 मी. उंच, सादातनगर येथे 12 मी. उंच व शहागंज येथे 16 मी. उंच असे तीन हायमास्ट उभारण्यासाठी रमजानचा पवित्र महिना तसेच गणेश उत्सव हे सणासुदीचे दिवस विचारात घेता सदर काम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 5(2)(2) अन्वये उपलब्ध गुत्तेदारामार्फत अंदाजपत्रकीय दराने विना निविदा काम करून घेण्यास व त्यासाठी लागणाऱ्या र.रू.11,29,514/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

त्याचप्रमाणे सभागृहात झालेल्या चर्चेनुसार 1) गजानन महाराज मंदिर चौक, 2) महानुभाव आश्रम(बीड बायपास), पैठण रोड येथील चौक आणि 3) वॉर्ड क्र.94 राजनगर उद्यान येथे हायमास्ट उभारण्याचे काम मुं.प्रां. मनपा अधिनियम 1949 चे कलम 5(2)(2) अन्वये उपलब्ध गुत्तेदारामार्फत अंदाजपत्रकीय दराने विना निविदा काम करून घेण्यास व त्यासाठी लागणाऱ्या खर्चासह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 136 :</u>**

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, मौजे औरंगाबाद येथील सर्व्हे नंबर 110/पैकी जमीनसाठी मिळकत धारकांनी रेखांकन प्रस्ताव सादर केला आहे. रेखांकन प्रस्तावाच्या अनुषंगाने कार्यालयातर्फे मिळकत धारकास प्रत्यक्ष जागेवर भूखंडाची आखणी सक्षम कार्यालयाकडून करण्यास व विकास खर्च जमा करण्यास कळविण्यात आले आहे. शहराच्या मंजुर विकास योजनेतील प्रस्तावानुसार उक्त मिळकतीची भागशः जमीन 15.00 मीटर रूंद रस्त्यात बाधीत होत आहे. मिळकत धारकांनी उक्त 15.00 मीटर रूंद विकास योजना रस्त्यात बाधीत क्षेत्राचा मोबदला खाजगी वाटाघाटीने प्रस्तावित रेखांकनाच्या विकास खर्चात वळती करण्यास विनंती केली आहे. मिळकत धारकांनी रेखांकनातील अंतर्गत रस्ते, खुली जागा आणि 15.00 मीटर रूंद विकास योजना रस्त्यात बाधीत क्षेत्राचा मोबदला भविष्यात मिळण्याचा हक्क अबाधीत राहील या अटीवर हक्क सोड पत्र क्रमांक 3647/2006 दिनांक 5.12.2006 नुसार महानगरपालिकेस हस्तांतर केला असून विकास योजना रस्त्याचे, अंतर्गत रस्त्याचे आणि खुली जागेचे क्षेत्र 7/12 उताारामध्ये फेर क्रमांक 900 नुसार महानगरपालिकेच्या नांवाची नोंद झालेली आहे.

सिमांकन नकाशानुसार 15.00 मीटर रूंद रस्याचे 2051.00 चौ.मी. बाधीत क्षेत्राचा मोबदल्यासाठी खाजगी वाटाघाटीने मुल्यांकन करण्यात आले आहे. नियमाप्रमाणे आवश्यक वजावटी करून देय मोबदला रक्कम रूपये 7,21,952/- होत आहे. बाधीत क्षेत्र पुर्वीच महानगरपालिकेच्या नांवे झालेले असून ताब्यात आहे. उक्त देय मोबदला रक्कम रू.7,21,952/- रेखांकनाच्या विकास खर्चा मध्ये वळती करणेस मान्यतेस्तव सादर. मोबदला रक्कम विकास खर्चात वळती झाल्यानंतर उर्वरीत विकास खर्चाची रक्कम मिळकत धारकाकडून जमा करून घेण्यात येईल.

भूसंपादनाच्या प्रस्तावानुसार खाजगी वाटाघाटीने मौजे औरंगाबाद येथील सर्व्हे नंबर 110/पैकी मधील 15.00 मीटर रूंद रस्ता बाधीत क्षेत्राचा देय मोबदला रूपये 7,21,952/- मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

पस्मावाम दर्शविल्याप्रमाणे मौजे औरंगाबाद येथील सर्व्हे नंबर 110/पैकी मंजुर विकास योजनेतील प्रस्तावानुसार उक्त मिळकतीची भागशः जमीन 15.00 मीटर रूंद रस्त्यात बाधीत 2051.00 चौ.मी. क्षेत्राचा देय मोबदला रूपये 7,21,952/- खाजगी वाटाघाटीने निश्चित करण्यात आलेला मोबदला प्रस्तावित रेखांकनाच्या विकास खर्चात वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 137 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.87 उल्कानगरी आदित्यनगर येथे सभागृह बांधणे करीता सा.बां.विभागाचेसन 2005-06 च्या जिल्हा दरसूचीनुसार रक्कम रू.18,49,235/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असुन सदरील अंदाजपत्रकास स्थायी समिती सभा दि.27.2.2007 ठराव क्र.265 अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदरील कामास्तव कार्यालयीन निविदा सुचना जा.क्र.मनपा/ई-निविदा/11/2007 दि.10.5.2007 अन्वये फेर निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत 02 निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या तारखेपर्यंत दोनही निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | उदय इंजिनिअरींग वर्क्स | - | 7.90% कमी दराने |
| 2. | म.सिद्यीकी अँड म.अझहर सिद्यीकी | - | 4.77% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अं.प.दरापेक्षा 7.90% कमी दराची निविदा उदय इंजिनिअरींग वर्क्स यांची प्राप्त झालेली आहे. त्यानुसार मा.आयुक्तांनी सदरील निविदा मान्यतेस्तव स्थायी समितीकडे सादर करणेबाबत शिफारस केलेली आहे.

त्यानुसार उदय इंजिनिअरींग वर्क्स यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 7.90% कमी दराची निविदा मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.87 उल्कानगरी आदित्यनगर येथे सभागृह बांधणे करीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 7.90% कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 138 :**

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, दिल्लीगेटच्या पश्चिमेकडील 18.00 मीटर रूंद विकास योजना रस्त्यात बाधीत 6(सहा) मिळकत धारकांस मोबदला देण्यासाठी मा.स्थायी समिती मधील ठराव क्रमांक 313 दि.20.3.2007 नुसार खर्चास मान्यता मिळालेली आहे. न.भू.क्र.7466, 7469, 7470, 7471, 7473/1, आणि 11451 या प्रमाणे 6(सहा) मिळकती आहेत.

उक्त रस्त्यात बाधीत मिळकतीचे सन 2006 चे शिघ्र सिध्द गणकानुसार मुल्यांकन करून खाजगी वाटाघाटीने भूसंपादन करण्यासाठी जे कार्यालयीन परिपत्रक आहे त्यानुसार विकास खर्च व जमीन विकास शुल्काची रक्कम आणि 20% डेव्हलपर्स नफा याची वजावट करून देय मोबदला रक्कम काढण्यात आलेली आहे. या देय मोबदला रक्कम न.भू.क्र. 7470, 7471 आणि 7473/1 च्या मिळकत धारकांनी आक्षेप घेतला असून विनंती केली की, त्यांच्या भूखंडासाठी आधीच स्वतंत्र पी.आर.कार्ड होते त्यामुळे विकास खर्च, जमीन विकास शुल्क आणि डेव्हलपर्स नफा यांची वजावट करण्यात येऊ नये.

उर्वरीत 3(तीन) मिळकती न.भू.क्र.7466, 7469, आणि 11451 च्या मिळकत धारकांनी त्यांना वेदांतनगर येथील रेखांकनातील महानगरपालिकेच्या जागेत अदलाबदल खरेदी खतानुसार दिलेले भूखंडाची परस्पर विक्री केलेली असल्याने ते भूखंड विकत घेतलेल्या व्यक्तीकडून खरेदी करून परत घेण्याची कार्यवाही करण्यात येईल. करीता वरील 3(तीन) मिळकतीचा मोबदला देण्यात येणार नाही.

न.भू.क्र.7470, 7471 आणि 7473/1 च्या मिळकतधारकास देण्यात येणाऱ्या मोबदला रक्कमेतुन विकास खर्च जमीन विकास शुल्क आणि विकासकाचा फायदा(20%) केलेली वजावट रद्द करण्यास मान्यता मिळाल्यास खालील प्रमाणे देय मोबदला रक्कम होईल.

| अ.क्र. | न.भु.क्र. | बाधीत क्षेत्र चौ.मी. | मा.स्थायी समितीची मान्यता मिळालेला मोबदला रू. | वि.ख., जमीन विकास शुल्क विकासकाचा नफा ची वजावट न करता येणारा देय मोबदला | फरकाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 7470 | 161.60 | 6,53,400/- | 8,40,320/- | 1,86,920/- |
| 2 | 7471 | 124.90 | 4,99,600/- | 6,49,480/- | 1,49,880/- |
| 3 | 7473/1 | 72.00 | 3,00,000/- | 3,90,000/- | 90,000/- |
| | | | 14,53,000/- | 18,79,800/- | 4,26,800/- |

करीता प्रकरणातील मोबदला रक्कमेबाबत प्रस्ताव निर्णयास्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिल्लीगेटच्या पश्चिमेकडील 18.00 मीटर रूंद विकास योजना रस्त्यात बाधीत 6(सहा) मिळकत धारकांस मोबदला देण्याबाबत न.भू.क्र. 7470, 7471 आणि 7473/1 च्या मिळकत धारकांनी विनंती केल्यानुसार त्यांच्या भूखंडासाठी आधीच स्वतंत्र पी.आर.कार्ड असल्यामुळे विकास खर्च, जमीन विकास शुल्क आणि डेव्हलपर्स नफा यांची वजावट न करता, 20% केलेली वजावट रद्द करण्यास व त्यानुसार येणारा देय मोबदला खालील दर्शविल्यानुसार अदा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | न.भु.क्र. | बाधीत क्षेत्र चौ.मी. | वि.ख., जमीन विकास शुल्क, विकासकाचा नफा ची वजावट न करता येणारा देय मोबदला |
|---|---|---|---|
| 1 | 7470 | 161.60 | 8,40,320/- |
| 2 | 7471 | 124.90 | 6,49,480/- |
| 3 | 7473/1 | 72.00 | 3,90,000/- |
| | | | 18,79,800/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 139 :</u>**

अतिरिक्त शहर अभियंता, मनपा औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.64 क्रांतीचौक येथे विविध ठिकाणी डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.खात्याच्या सन 2006-07 च्या दरसुचीप्रमाणे तयार करण्यात आलेले असून कामाचे अंदाजपत्रक रू.19,77,000/- चे आहे. या कामाचा खर्च सन 2007-08 या अर्थसंकल्पातील नवीन डांबरीकरण या लेखाशिर्षामधून करण्यात येणार आहे. सदरील कामाच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी शिफारस करून मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव ठेवणेसाठी आदेशीत केलेले आहे.

तरी रू.19,77,000/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.64 क्रांतीचौक येथे विविध ठिकाणी डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू. 19,77,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>ऐनवेळचे विषय</u>**

**<u>विषय क्र. 140 :</u>**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.15 स्वामी विवेकानंदनगर येथे विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.विभागाच्या सन 2006-07 च्या दरसुचीप्रमाणे तयार करण्यात आलेले असून कामाचे अंदाजपत्रक रू.13,94,300/- चे आहे. या कामाचा खर्च सन 2007-08 या अर्थसंकल्पातील नवीन डांबरी रस्ते या लेखाशिर्षकामधून करण्यात येणार असून सदरील कामातील रस्त्याची लांबी 955 मी. व रूंदी सरासरी 5.50 मी. आहे. सदरील कामाच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी शिफारस करून स्थायी समितीच्या मंजुरीस्तव ठेवणेसाठी आदेशीत केलेले आहे.

तरी रू.13,94,300/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.15 स्वामी विवेकानंदनगर येथे विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू. 13,94,300/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 141 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.15 एन-12 सिडको येथे बहुउद्देशीय हॉल व सभागृह बांधणे करीता सा.बां. विभागाच्या सन 2006-07 च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.19,99,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास स्थायी समिती समोर सादर करणेबाबत मा.आयुक्त यांनी शिफारस केलेली आहे.

सदरील कामाचा खर्च सन 2007-08 या आर्थिक वर्षा अंतर्गत विकास इमारती, शाळा व दवाखाने या लेखा शिर्षा अंतर्गत करण्यात येईल. त्यानुसार उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.19,99,000/- चा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.15 एन-12 सिडको येथे बहुउद्देशीय हॉल व सभागृह बांधणे करीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.19,99,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 142 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.88 रज्जुभैय्या व्यायामशाळा, तापडीयानगर जवळ बॉस्केटबॉल, स्केटींग ग्राऊंड तयार करण्याकरीता सा.बां.विभागाच्या सन 2006-07 च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रूपये 12,99,224/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास स्थायी समिती समोर सादर करणे बाबत मा.आयुक्त यांनी शिफारस केलेली आहे.

सदरील कामाचा खर्च सन 2007-08 या आर्थिक वर्षा अंतर्गत क्रिडा संकुले या लेखा शिर्षा अंतर्गत करण्यात येईल. त्यानुसार उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रूपये 12,99,224/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.88 रज्जुभैय्या व्यायामशाळा, तापडीयानगर जवळ बॉस्केटबॉल, स्केटींग ग्राऊंड तयार करण्याचे कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.12,99,224/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 143 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मुळ प्रस्ताव वॉर्ड क्र.74(जुना) येथे सेंट्रल नाक्या समोरील दिलकश हॉटेल ते रामविहार हौ.सोसायटी पर्यंत 450 मीमी व्यासाची अर्धगोलाकार आरसीसी गटार बांधणे या कामाचे अंदाजपत्रक र.रू.4,94,000/- अर्थसंकल्प सन 2005-06 मधील तरतुदीनुसार प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेऊन निविदा कार्यवाही करून ठेकेदारामार्फत काम सुरू केले असता सन 2006-07 मध्ये नव्याने निवडून आलेले मनपा सदस्य सदर वॉर्ड क्र.74(जुना), नवीन वॉर्ड क्र.52 चे स.नगरसेवक श्री.अबुबकर अमोदी यांनी मुळ मंजूर कामास हरकत घेतली असता पुन्हा प्रकरणी मुळ मंजूर रक्कमेचे आरसीसी अर्धगोलाकार गटार कामाऐवजी दगडी मोठी गटार बांधण्यास्तव स.नगरसेवक यांनी वॉर्डात मध्यवर्ती जकात नाक्याच्या मुख्य रस्त्यालगत बांधण्याची सूचना केली असता त्या अनुषंगाने उपरोक्त कामाचे प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेऊन पुन्हा निविदा कार्यवाही करून ठेकेदार श्री.मोहंमद अजहर यांचे कडून मंजूर निविदा दर अं.प.दरापेक्षा 2% कमी या दराने काम करून घेतले. मंजूर निविदा रक्कम रू.4,93,913/- या रक्कमेपैकी आतापर्यंत उपरोक्त कामाचे प्रथम व द्वितीय दरम्यानचे एकुण देयक रक्कम रू.4,80,713/- संबंधीत ठेकेदारास अदा करण्यात आलेले आहे. पुन्हा उपरोक्त कामात उर्वरीत गटारीची लांबी वाढविणे म्हणजेच अतिरिक्त वाढीव काम करणे आवश्यक असल्याने मुळ प्रस्तावात नसल्याने, मुळ प्रस्तावात वाढीव कामाची समाविष्ट तरतुदी अभावी केले नव्हते. परंतु सध्याचे स.नगरसेवक, वॉर्ड क्र.52 यांनी प्रत्यक्ष स्थळी सुचना केल्यानुसार व उर्वरीत गटारीचे काम केल्याशिवाय गटारीचा वापर करणे शक्य होणार नसल्याने उपरोक्त मुळ कामाचे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.12,94,715/- चे तयार करण्यात आले. मुळ रक्कम वजा जाता वाढीव रक्कम रू.8,00,802/- ची वाढ झालेली आहे. वाढीव कामास दि.30/3/2007 रोजी अर्थसंकल्प 2007-08 मध्ये लेखाशिर्ष शहरी भागात खुल्या गटारी(स्पील) या तरतुदीमधून मा.आयुक्तांनी मान्यता दिली आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.74(जुना) नवीन वॉर्ड क्र.52 येथे सेंट्रल नाक्या समोरील दिलकश हॉटेल ते रामविहार हौ.सोसायटी पर्यंत 450 मीमी व्यासाची अर्धगोलाकार आरसीसी गटार बांधणे या कामात उर्वरीत गटारीची लांबी वाढविणे म्हणजेच अतिरिक्त वाढीव काम करणे आवश्यक असल्याने

सदरील कामासाठी रक्कम रू.12,94,715/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास तसेच रक्कम रू.8,00,802/- चे वाढीव काम, मुळ कामाचे गुत्तेदार श्री.मोहंमद अजहर यांचे कडून मंजूर निविदा दरानुसार म्हणजेच अं.प.दरापेक्षा 2% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 144 :**

उप आयुक्त(महसूल), महानगरपालिका औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहेत की, एन-10, टी.व्ही.सेंटर चौक जवळील प्राकृतिक क्रिडा संकुलाचे मैदान आनंद गणेश मेळावा साजरा करण्यासाठी दिनांक 15.9.2007 ते 7.10.2007 पर्यंतच्या कालावधीसाठी अध्यक्ष, राजु खरे मित्र मंडळ, औरंगाबाद यांनी मागणी केली आहे.

सदरील मैदानाचे प्रतिदिन भाडे रू.2700/- प्रमाणे दि.15.9.2007 ते 7.10.2007 पर्यंत एकूण 23 दिवसाचे भाडे रू.62,100/- भरणा करणेसाठी मा.आयक्त यांनी मान्यता दिली आहे. तरी वरील प्रमाणे भाडे आकारून सदरील मैदान आनंद गणेश मेळावा साजरा करण्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात अध्यक्ष, राजु खरे मित्र मंडळ, औरंगाबाद यांना भाड्याने देण्यास प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन-10, टी.व्ही.सेंटर चौक जवळील प्राकृतिक क्रिडा संकुलाचे मैदान आनंद गणेश मेळावा साजरा करण्यासाठी संबंधीतास आदेश झाल्याच्या तारखेपासून ते 7.10.2007 पर्यंतच्या कालावधीसाठी अध्यक्ष, राजु खरे मित्र मंडळ, औरंगाबाद यांना सदरील मैदानाचे प्रतिदिन भाडे रू.2700/- प्रमाणे आकरून आनंद गणेश मेळावा साजरा करण्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात भाड्याने देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 145 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.विरोधी पक्ष नेता श्री.अब्दुल साजेद यांच्या स्वेच्छा निधीतून रू.4,25,000/- व वॉर्ड क्र.41 च्या स.नगरसेविका श्रीमती नजमा कुरेशी यांच्या स्वेच्छा निधीतून रू.2,50,000/- तसेच वॉर्ड क्र.97 बनेवाडी गांव ते स्मशानभुमी पर्यंत विकास करणेसाठीचे रू.4.00 लक्ष तरतुद वळती करणे बाबतचा सर्वसाधारण सभा ठराव क्र.1052, दिनांक 2/8/2007 नुसार वळती करण्यात आलेले एकूण रक्कम रू.10,75,000/- चे लेखाशिर्ष जामा मस्जीद कब्रस्थान परिसरामध्ये जेथे दफन विधीच्या अगोदर जी विधी होते म्हणजे जेथे नमाज-ए-जनाजा होते तेथे पेव्हर ब्लॉक बसविणेसाठी रक्कम रूपये 10,75,000/- चे अंदाजपत्रक स्थायी समितीसमोर मंजुरीसाठी ठेवणेकरीता मा.आयुक्त यांनी शिफारस केली आहे.

सदरील काम तातडीने पुर्ण करणे बाबत मा.विरोधी पक्ष नेता यांनी मागणी केलेली आहे. त्यामुळे तीन दिवसांची अल्प मुदतीची निविदा सूचना प्रसिध्दीस देण्यात येऊन काम करण्यात येईल. तरी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार जामा मस्जीद कब्रस्थान परिसरामध्ये जेथे दफन विधीच्या अगोदर जी विधी (नमाज-ए-जनाजा) होते तेथे पेव्हर ब्लॉक बसविणेचे कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.10,75,000/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाची तातडी लक्षात घेता तीन दिवसांची अल्प मुदतीची निविदा मागवून काम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 146 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.95 पदमपुरा प्रभागाचे स.नगरसेवक श्री.गजानन बारवाल यांनी विनंती केली आहे की, पदमपुरा येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा फार दिवसांपुर्वी बसविलेले असून तो अत्यंत जुना झाल्याने खराब दिसत आहे. त्यामुळे या ठिकाणी नवीन पुतळा

बसविण्याची नागरीकांची मागणी आहे. सन 2007-2008 च्या अर्थसंकल्पात पृष्ठ क्र.W-191 अ.क्र.3 वर पदमपुरा येथील नवी वस्ती येथे डॉ.आंबेडकर यांचा नवीन पुतळा बसविणे साठी र.रू.4.00 ची तरतुद करण्यात आलेली आहे.

सदरील ठिकाणी नवीन पुतळा त्वरीत बसविण्यात यावा. महाराष्ट्र शासनाच्या कला संचालनालयाची मान्यता असलेल्या कलाकराकडून सदील पुतळ्याचे काम करून घेण्यात यावे. करीता पदमपुरा येथील नवी वस्ती येथे डॉ.आंबेडकर यांचा नवीन पुतळा बसविण्याचे काम मुं.प्रां.मनपा अधिनियम 1949 चे कलम 5(2)(2) अन्वये वर नमूद केल्यानुसार करून घेण्याच्या मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

सूचक :संजय शिरसाट अनुमोदक : संजय जोशी

**संवाद :**

श्री.संजय शिरसाट : वॉर्ड क्र.95 पदमपुरा प्रभागाचे स.नगरसेवक श्री.गजानन बारवाल यांनी त्यांचे वॉर्डातील नवी वस्ती येथील डॉ.आंबेडकर यांचा नवीन पुतळा बसविण्याची विनंती केली आहे. प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

मा. सभापती : प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. तसेच स.सदस्यांनी सूचना केल्यानुसार सदरील काम मुं.प्रां. मनपा अधिनियम 1949 चे कलम 5(2)(2) अन्वये करून घेण्यास, त्यासाठी लागणाऱ्या खर्चासह मान्यता देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार पदमपुरा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा अत्यंत जुना झाल्याने खराब दिसत आहे. त्यामुळे या ठिकाणी नवीन पुतळा बसविण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या कला संचालनालयाची मान्यता असलेल्या कलाकराकडून सदील पुतळ्याचे काम करून घेण्यास व सदरील काम मुं.प्रां.मनपा अधिनियम 1949 चे कलम 5(2)(2) अन्वये करून घेण्यास, त्यासाठी लागणाऱ्या खर्चासह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 147 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, बांधकाम विभाग क्र.2 अंतर्गत येणाऱ्या मुख्य रस्त्यांचे डांबरी पॅचवर्क करणे व विविध चौकातील वाहतूक बेटांची दुरूस्ती करणे तसेच दुभाजकाची रंगरंगोटी करणे या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.39,30,000/- असून निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 4 निविदा पत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी 4 निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. त्याचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1. | के.बी. पाथ्रीकर | 21.13% कमी दराने |
| 2. | राजेंद्रसिंग डी.अजितसिंग | 15.51% कमी दराने |
| 3. | चंद्रम्मा आशन्ना | 13.78% कमी दराने |
| 4. | ए. एस. कन्स्ट्रक्शन | 7.99% कमी दराने |

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी के.बी. पाथ्रीकर यांचे दर तुलनात्मकदृट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 21.13% ने कमी आहेत. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी के.बी. पाथ्रीकर यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 21.13% कमी दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बांधकाम विभाग क्र.2 अंतर्गत येणाऱ्या मुख्य रस्त्यांचे डांबरी पॅचवर्क करणे व विविध चौकातील वाहतूक बेटांची दुरूस्ती करणे तसेच दुभाजकाची रंगरंगोटी करणे या कामासाठी

प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 21.13% कमी दराची श्री.के.बी.पाथ्रीकर यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 148 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, कोकणवाडी येथील पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर वाहतुक बेटाचे सौंदर्यीकरण करणे, यामध्ये म्युरल, अहिल्यादेवींच्या कार्यावर प्रकाश टाकणे व इतर सौंदर्यीकरणाची कामे करणे ही अत्यंत कलाकुसरीची बाब असल्याने सदर काम मुं.प्रां.मनपा अधिनियम 1949 चे कलम 5(2)2 अंतर्गत, अशा स्वरूपाची कामे करणाऱ्या उपलब्ध कलाकारामार्फत/कंत्राटदारामार्फत करून घेणेकरीता कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.8,96,000/- चा प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कोकणवाडी येथील पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर वाहतुक बेटाचे सौंदर्यीकरण करणे, यामध्ये म्युरल, अहिल्यादेवींच्या कार्यावर प्रकाश टाकणे व इतर सौंदर्यीकरणाचे काम मुं.प्रां.मनपा अधिनियम 1949 चे कलम 5(2)2 अंतर्गत, अशा स्वरूपाची कामे करणाऱ्या उपलब्ध कलाकारामार्फत/कंत्राटदारामार्फत करून घेण्यास व त्यासाठीच्या र.रू.8,96,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

राष्ट्रगीतानंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषीत केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद